# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.11.2025** **वारःशुक्रवार**

---

१. बिहार विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीला सुरुवात

२. ४४व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळयाला आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ

४. भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान पहिला कसोटी क्रिकेट सामना आजपासून कोलकत्यात

आणि

५. छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात थंडीची लाट येण्याचा अंदाज

**<u>बिहार</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीची प्रक्रिया आज सकाळी ८ वाजल्यापासून सुरु झाली आहे. बिहारमधील ३८ जिल्ह्यांतील ४६ मतदान केंद्रावर ही मतमोजणी होत आहे. विधानसभेच्या २४३ जागांसाठी दोन हजार ६१६ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आज ठरणार आहे. मतमोजणीच्या दोन तासांनंतर निकालाचे कल येण्याची शक्यता आहे. टपाली तिकीटांची मोजणी सकाळी ८ वाजेपासून होत आहे

गेल्या ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान झाले. बिहार विधानसभा निवडणुकीत १९५१ नंतर आतापर्यंतचं सर्वाधिक ६७ पुर्णांक १३ टक्के मतदान झाले.

**<u>राष्ट्रपती</u>**

2047 पर्यंत आपला देश विकसित भारत म्हणून उदयास येईल असे गौरवोद्गार राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल काढले.  बोटत्सवाना इथं भारतीय समुदायाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. आपल्या नागरिकांनी केलेल्या कामगिरीचा भारताला अभिमान आहे. भारत- बोटत्सवाना दरम्यानचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी तुमचं योगदान महत्वाचं आहे असंही त्या म्हणाल्या.

चित्ताहस्तांतरण

दरम्यान भारताच्या प्रोजेक्ट चित्ताला बोत्सवानाने ८ चित्त्यांची देणगी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाच्या राष्ट्रपती डुमा बोको यांच्यात झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर काल भारताकडे प्रतीकात्मक पद्धतीने चित्ते हस्तांतरित करण्यात आले. पुढील वर्षी दक्षिण आफ्रिकेतून ८  चित्ते भारतात स्थलांतरित केले जाणार आहेत. आपला दौरा संपवून राष्ट्रपती आज सकाळी मायदेशी परतल्या आहेत.

**<u>अमित</u>**

दिल्लीतील कार स्फोट घटनेतील जबाबदार असलेल्या सर्वांना कठोर शिक्षा दिली जाईल. या घटनेतील दोषींना शिक्षा झाल्याने जगाला असा संदेश मिळेल की कोणताही दहशतवादी भारतात असे कृत्य करण्याचा विचारही करू नये. असा विश्वास गृहमंत्री अमित शहा यांनी काल व्यक्त केला. गुजरातमधील मोतीभाई आर. चौधरी सागर सैनिक शाळा आणि सागर सेंद्रिय प्रकल्पाचं दुरस्थ माध्यमातून उद्‌घाटन करताना ते बोलत होते. केंद्र सरकारने सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाअंतर्गत देशभरात १०० नवीन सैनिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती शहा यांनी दिली.

**<u>ट्रेडफेअर</u>**

नवी दिल्लीत भारत मंडप इथं आजपासून ४४ वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा सुरू होत आहे. यंदाचा हा व्यापार मेळा एक भारत श्रेष्ठ भारत या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि बिहार ही राज्यं या आंतरराष्ट्रीय मेळ्याची भागीदार असून यामध्ये झारखंड हे राज्य केंद्रस्थानी असणार आहे. युएई, चीन, इराण, दक्षिण कोरिया आणि इजिप्तसह १२ देशांचा या १४ दिवस चालणाऱ्या व्यापार मेळ्यात सहभाग आहे.

**<u>उराष्ट्रपती</u>**

भारतीय दूरसंचार सेवेच्या हिरक महोत्सवी कार्यक्रमाचं उद्‌घाटन उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे . भारतीय दूरसंचार सेवेला 60 वर्ष पूर्ण झाली असून देशभरातील दूरसंचार क्षेत्राच्या विकासात सेवा देणारा प्रमुख घटक म्हणून काम करत आहे.

**<u>बालदिन</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन केलं आहे. आजचा दिवस बाल दिन म्हणून साजरा केला जातो, त्या निमित्त आज देशभर विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

साहित्य अकादमी-बाल साहित्य पुरस्कार आज  नवी दिल्ली इथं प्रदान केले जातील. हिंदी साहित्यात, हा पुरस्कार सुशील शुक्ल यांना 'एक बटे बारह' साठी प्रदान केला जाईल, तर मराठी भाषेसाठीचा पुरस्कार सुरेश सावंत यांच्या आभाळमाया या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे.

पाकिस्तान

पाकिस्तानमध्ये काल २७ व्या घटना दुरुस्ती विधेयकाला दोन्ही सभागृहाने मंजुरी दिली. नव्या कायद्यानुसार पाकिस्तानी लष्कर प्रमुख फील्ड मार्शल सय्यद असीम मुनीर यांनी नव्याने सर्वाधिकार प्राप्त झाले आहेत. या घटनात्मक दुरुस्तीमुळे सैन्याच्या सर्व शाखांवर त्यांचे नियंत्रण असेल तसंच

न्यायपालिकेतही भविष्यातील कोणत्याही कायदेशीर खटल्यापासून किंवा आव्हानांपासून त्यांचे संरक्षण होणार आहे. पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी घटना दुरुस्ती विधेयकाला दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिल्याची माहिती दिली.

**भारत-नेपाळ**

भारत आणि नेपाळमधील मालवाहतूक सुरळीत करण्याच्या धोरणात सुधारणा करण्यासाठीच्या विनिमय पत्राचं काल आदान प्रदान करण्यात आलं. कैंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि नेपाळचे उद्योगमंत्री अनिल कुमार सिन्हा यांच्यादरम्यान काल नवी दिल्ली इथं द्विपक्षीय बैठक झाली त्यावेळी हे पत्र देण्यात आलं. दोन्ही देशांदरम्यान जोगबनी-बिराटनगर रेल्वे लिंकवर कंटेनर आधारित आणि मोठ्या  कार्गो वाहतूक थेट रेल्वे मार्गाने जोडले जाणार आहे  या उपक्रमामुळे कोलकाता आणि विशाखापट्टणम बंदरांपासून नेपाळ कस्टम्स यार्ड कार्गो स्थानकापर्यंत वाहतूक सुलभ होईल.

**ट्रंप-पूल-बीबीसी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षा डोनाल्ड ट्रंप  यांनी 6 जानेवारी 2021 रोजी केलेल्या भाषणाचं चुकीच्या पद्धतीनं संपादन करून तो प्रसारित केल्या प्रकरणी ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन अर्थात बीबीसीने ट्रम्प यांची माफी मागितली आहे. Bbc नं  हा कार्यक्रम आपल्या वाहिनीवरुन हटवला आहे.  दरम्यान या प्रकरणी बीबीसीचे महासंचालक टिम डेव्हि आणि वृत्तविभागाचे प्रमुख दबोरा टरनेस यांना पदावरुन हटवण्यात आलं आहे.

**फिलिपिन्सभारतभागीदारी**

फिलिपिन्सचे अमेरिकेतले राजदूत खोसे मानुएल देल गायेगो यांनी भारत-फिलिपिन्स यांच्यातील दृढ भागीदारीची प्रशंसा केली आहे. वॉशिंग्टन इथं एका कार्यक्रमात  बोलताना, ते म्हणाले की भारत हा फिलिपिन्सचा जवळचा मित्र आणि महत्त्वाचा संरक्षण भागीदार आहे.

**कतारमनुष्यबळ**

भारत जगातील सर्वात जास्त तरुण मनुष्यबळ आहे. महाराष्ट्र शासनासोबत कतारने करार केल्यास इथल्या विद्यार्थ्यांना कतारमधील उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकासाचं प्रशिक्षण देण्यात येईल. तसंच कतारनं महाराष्ट्रात गुंतवणूक करावी आणि राज्याच्या विकासात योगदान द्यावं, असं आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल केलं. यामुळे दोन्ही देशांना लाभ होईल असं ते म्हणाले. कौशल्य मंत्री लोढा यांनी कतार लीडरशिप सेंटरच्या शिष्टमंडळाबरोबर मुंबईत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आवाहन केलं. कतार आणि भारताचे १९७३ पासून राजनैतिक संबंध आहेत. कतारमध्ये साडेआठ लाख भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. ते कतारच्या विकास प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवित आहेत. असंही लोढा म्हणाले.

**नागालँड**

पश्चिम बंगालसह ईशान्येकडील आठ  राज्यांच्या अंमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या प्रमुखांची पहिली प्रादेशिक परिषद नागालँडच्या  चुमोकेदिमा इथं सुरू झाली. राष्ट्रीय 'नशा मुक्त भारत' अभियानांतर्गत, नागालँड पोलिस नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) च्या समन्वयाने दोन दिवसांची ही परिषद आयोजित करण्यात आली आहे, ज्यामध्ये अमली पदार्थांचा पुरवठा कमी करणे, यासंबंधीच्या नियमांची अंमलबजावणी, अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्यांचं पुनर्वसन आणि व्यसनमुक्ती याविषयावर चर्चा होत आहे. या परिषदेत नार्कोटिक्स नियंत्रण मंडळ, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय आणि ईशान्येकडील आठही राज्ये आणि पश्चिम बंगालमधील पोलिस विभागांचे अधिकारी उपस्थित आहेत.

**<u>दिल्ली</u>**

दिल्लीत नुकत्यात झालेल्या कार स्फोट प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी विमान प्रवाशांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय उड्डाण सुरू होण्याच्या निर्धारित वेळेच्या किमान तीन तास विमानतळावर पोहोचावं तसंच मेट्रो आणि रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी किमान 20 मिनिटे आधीच निर्धारित ठिकाणी पोहोचावं अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

**<u>अपघात</u>**

पुण्यातील नवले पुलावर काल संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला. पुलावर गाड्यांची एकमेकांना धडक झाल्यानंतर दोन कंटेनरनी पेट घेतला. यामध्ये एक चारचाकी वाहन अडकले आणि लागलेल्या आगीत त्यामधील नागरिकांचा मृत्यू झाला. यामध्ये अनेकजण जखमी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<u>क्रिकेट-पूल</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळला जाईल. सकाळी साडे 9 वाजता सामना सुरू होईल. दिल्ली बॉम्बस्फोटानंतर कोलकाता पोलिसांनी ईडन गार्डन्स मैदान आणि आसपासच्या परिसरात सुरक्षा वाढवली आहे.

**<u>हवामान</u>**

पुढील दोन दिवस छत्तीसगड आणि मध्य प्रदेशात थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसंच इशान्ये कडील राज्य आणि उत्तर प्रदेशात धुक्याची चादर पसरेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. नाशिक, जळगावमध्ये पारा १० अंशांवर घसरला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार**